।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

ज्ञानामृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ९ वे ◈अंक २ रा ◈ ज्येष्ठ-आषाढ–श्रावण- अधिक भाद्रपद शके १९३४ ◈ २१ मे २०१२ ते १६ सप्टें. २०१२

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग

◆ भक्तगाथा - ०३

◆ गुंजारव - १
- मधुरा ०५

◆ गोजिरवाणी -
सौ. नीता कुलकर्णी ०६

◆ शब्द तेंचि छेडीता
- मुधरा ०७

◆ अहो ऐकलतं का? -
- मुक्ता ०९

◆ गुंजारव - २
- आकांक्षा १०

◆ रुचि रुचि भोजन - १०

◆ उत्सव विशेष - ११

# भक्तगाथा...

धारेस बोवांचा भिक्षेचा नित्यक्रम चालू असता एके दिवशी ते नव्या पुऱ्यातील श्री. रा. काशीनाथ कृष्ण लेले यांच्या घरी सहज भिक्षा मागण्यास गेले. रा. काशीनाथपंत लेले हे धार येथील प्रसिद्ध पुरुष होते. सन् १८७६ साली धारचे हायस्कूलमध्ये हे हेडमास्तर होते. सन् १८८१ साली काही राजकारणामुळे त्यास धार सोडावे लागले. पुढे इंदूर येथे शाळेत काम करून सन् १८८७ साली ते देवास येथे शाळाहेडमास्तर व सुपरिंटेंडेन्ट झाले. तेथे १३ वर्षे नोकरी करून सन् १८९९ साली पुन्हा ते धारेस परत आले व तेथील हायस्कूलचे हेडमास्तर व विद्याधिकारी झाले. यांनीच प्राचीन भोजदेवाच्या राजघराण्याचा शोध करून स्टेट गॅझेटियरकरीता इतिहास तयार केला. तेव्हा पासून काशीनाथपंत धार संस्थानाचे इतिहासाचे काम करीत होते. श्री बलभीममहाराजांच्या प्रमुख शिष्यांपैकी हे एक होत. सन् १८९९ साली यांची व बोवांची प्रथम गाठ झाली. एके दिवशी बोवा भिक्षा मागण्याकरिता काशीनाथपंताच्या घरी आले. घरात पाऊल टाकताच नेहमींच्या रिवाजाप्रमाणे बोवांनी रामदासी बाण्याचा श्लोक प्रेमळ वाणीने व ठसकेदार स्वराने म्हटला. तो श्लोक श्री काशीनाथपंत लेले यांनी जवळील कचेरीतून ऐकला. श्लोक ऐकून श्लोकाच्या अर्थाने व बोवांच्या प्रेमळ स्वराने त्यांचे मन इतके आकर्षिले गेले की, दाराशी येऊन त्यांनी श्लोक पुनः एकदा म्हणण्या बद्दल बोवास विनंती केली. काशीनाथ पंताची विनंती ऐकून बोवांनी पुनः एक वार तो श्लोक म्हटला. श्लोक म्हणत असता बोवांची मुद्रा, प्रेमळवाणी व डोळ्यांतील चमक या गोष्टींनी काशीनाथपंतांचे चित्त इतके वेधिले गेले की, त्यांनी तात्काळ कचेरीतील काम बाजूला ठेवून अगोदर बोवांस घरातून भिक्षा घालावयास लाविली व कचेरीत त्यास बोलावून त्यांजविषयी थोडी तांत्रिक विचारपूस केली. काशीनाथपंतांच्या अंतःकरणावर बोवांच्या श्लोकाचा अथवा एकंदर दर्शनाचा (त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे) 'दृष्टि पडतांक्षणीचं प्रेम' या म्हणीप्रमाणें परिणाम झाला. 'दर्शनें प्रशस्तीसी ठावो।' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे बोवाचं दर्शन होताच त्याजविषयी आदर व प्रेम काशीनाथपंतास वाटले. तेव्हापासून बोवांचा व त्यांचा स्नेह जडला. बोवा भिक्षेस आले की, त्यांस बसवून घेऊन त्यांजबरोबर काशीनाथपंत बोलू लागले व पारमार्थिक चर्चा थोडीफार करू लागले. बोवा परमार्थाव्यतिरिक्त कोणत्याही विषयावर बोलत नसत.



एके दिवशी काशीनाथपंतांच्या घरी बोवा भिक्षेस गेले होते. बोवांस त्यांनी थोडावेळ बसवून घेतले व पारमार्थिक चर्चा निघाली. बोलता बोलता दोघेही इतके रंगून गेले की, दोघेही देहभान विसरले. बोवास, आपली बायको व मुलगा भुकेने व्याप्त होऊन आपली वाट पहात असतील व 'बाबा अजून का आले नाहीत' म्हणून काळजी करीत असतील याची शुद्धीच राहिली नाही. बऱ्याच वेळाने त्यांचे बोलणे आटोपल्यावर बोवा घरी गेले व मग ते तिघेजण जेवले, कधी कधी तर काशीनाथपंत आपले घरीच बोवांस भोजनास ठेवून घेऊन बोवांची पत्नी व मुलगा यांसही जेवण्यास बोलावून घेत. असा प्रसंग नित्य घडू लागला व काशीनाथपंताचे व बोवांचे परस्पर प्रेम दुणावले. काशीनाथपंतास बोवांचा एकप्रकारे नादच लागला. ते एकसारखी बोवांची भिक्षेची वेळ झाली की, दारात उभे राहून त्यांची वाट पहात असत. बोवा भिक्षा मागत मागत काशीनाथपंतांच्या घरी आले की, बहुतेक त्यांचे भिक्षाटन संपत असे व त्याची त्यांस फारशी पर्वाही वाटत नसे.

एके दिवशी बोवांस काशिनाथपंतांनी विनंती केली की, ''पुरुषांस आपल्यासारख्यांची भेट होऊन काही सदुपदेश ऐकण्याचा सुयोग येतो, पण घरातील दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियांस श्रवणाचा योग येत नाही. तेव्हा आपण आपल्या मुखाने आमच्या घरातील बायका मंडळीस काही तरी ऐकवावें.'' ही विनंती बोवांनी तात्काळ कबूल करून, दररोज नियमानें येऊन, समग्र भावार्थ रामायण त्यांचेकडील सर्व बायका मंडळींनां ऐकविले. या पुराणास दुसरीही पुष्कळ मंडळी येत असत. याप्रमाणे दिवसेंदिवस बोवांशी काशीनाथपंत लेले व धार येथील दुसरी काही मंडळी यांचा स्नेह वाढत गेला.

बलभीमाबोवा नेहमी जाता जाता काही ना काही प्रेमळ भजन म्हणत असत. एके दिवशी बोवा **'आनंदी माय। तुजविण गमें न करूं मी काय।।'** हे भजन मोठ्याप्रेमाने म्हणत-म्हणत व त्या प्रेमभरात डोळे अर्धोन्मीलित करून आपल्या घरी जात होते. त्याच रस्त्याने समोरून बाजारातील भैय्या येत होता. त्याने भजनानंदांत डोलत हळू हळू येत असणाऱ्या बोवांच्या मूर्तीस पाहिले व बोवांचे वरील भजन ऐकले. नंतर हळूच बोवांजवळ येऊन त्याने एकदम बोवांचा हात धरला. आपला हात कोणी तरी धरून आपणांस थांबविले असे कळताच बोवांनी डोळे उघडले व पहातात तर तो एक इसम आपले हात धरून आपणांस काही तरी प्रश्न करीत आहे. असे त्यास

# गुंजारव - ९

- मधुरा

**तेव्हा आणि आता...**

तेव्हा...
अंतरात काही दाटले होते,
जणू जुनेच काही अंतरीचे सापडले होते
लागला होता जाळ साऱ्या चुकांचा
धैर्यच सारे पाण्यात वितळत होते
डाचत होते आत जुने काही,
शहारे तीच धूळ झाडत होते

पण आता,
स्थैर्यच आत संचरित आहे,
अंतरीचे कोपरे व्यापीत आहे
रूजले होते अनोखे बीज नवे
त्याचीच कळी आत उमलत आहे
अंधार व्यापला होता कुडीत या साऱ्या
लख्ख काही आत प्रकाशत आहे
वलय दाटले होते आत बाहेर
त्याचे सारे फास वितळत आहे
गुरुदेवांनी केले असे काही मज
निळी शालच जणू मधुरा पांघरत आहे!

**पान नं. ४ वरून**

आढळून आले. 'बोवाजी, तुम्ही असे वेड्यासारीखे काय बडबडत चालला आहां? व हाक कोणाला मारीत आहांत?' हा प्रश्न ऐकून बोवा शांतपणे त्यास म्हणाले, 'जगातील प्रत्येक प्राणी हा कोणात्या ना कोणत्या तरी विषयाच्या पाठीमागे वेडा बनलेला आहे, त्याप्रमाणे मीही एक वेडा आहे. फरक येवढाच की, मी माझ्या मातेच्या नामाने वेडा

**पान नं. ८ वर**



# गोजिरवाणी...✍

- **सौ. नीता कुलकर्णी**

**मुले-** आजी, आता सांग ना गोष्टीचा पुढचा अर्थ!

**आजी-** ठिक आहे. काल आपण प्रल्हादाला दिलेल्या सापाच्या पेटीतील शिक्षा पाहिली. आता पुढची शिक्षा कोणती सांगा बरं!

**मुले-** त्याला उंच कड्यावरून ढकलून द्यावयास सांगतात.

**आजी-** बरोबर! पण तरीही तो वाचतो नाही का? बरं का मुलांनो परिस्थितीचा कडेलोट होणे हा शब्द तर आपण व्यवहारातही वापरतो. म्हणजेच एखादी परिस्थिती आपल्या हाताबाहेर जाते किंवा आपली सहनशक्ती संपली असेच आपल्याला वाटते नाही का?

**मुले-** हो आजी! खूपदा असे होते. शाळेचा निकाल वाईट लागतो. मग आईबाबाही रागवतात. शाळेतले टीचर्सही ओरडतात. काय करावे काहीच कळत नाही.

**आजी-** येथे प्रल्हाद जिवंत रहातो, याचाच अर्थ त्या परिस्थितीने आपण गांगरून जात नाही किंवा तिला बळी पडत नाही असाच होतो कळले का?

**मुले -** होय आजी, म्हणजेच आपण खऱ्या अर्थी शांत राहून त्यावर मार्ग काढायला हवा!

**आजी -** अगदी बरोबर! आता पुढील शिक्षा कुठली?

**मुले -** त्याला खोल समुद्रात टाकतात. पण तिथे एक कमळ येते व त्यास वाचवते.

**आजी -** हं! बऱ्याचदा आपल्या मनाविरूद्ध घटना घडतात. आपण खूप दुःखी होतो व त्या दुःखातच स्वतःला बुडवून टाकतो. समुद्रात गटांगळ्या खाण्याप्रमाणेच आपले वागणे असते. म्हणजेच आपली रोजची कामे, कर्तव्ये हीपण आपण विसरतो. मग कमळ म्हणजे काय तर आपल्या आतीलच एखादा विचार जो आपल्याला या सर्वांमधून वर काढतो. तो विचार आपल्याला कधी घरातील मोठी माणसे तर कधी शिक्षकही देतात.

**मुले -** (आश्चर्याने) हो का? हे तर आम्हाला माहितच नव्हते.

**आजी-** आता राहिल ना लक्षात? आज इतकेच पुरे! उद्या पुढची गोष्ट बघू!

(क्रमशः)

# शब्द तेचि छेडिता...✍

**मधुरा**

खाँबो बिना निगाहें मेरी जी रही थी, कोई नहीं था ये अकेली मेरी थी जिदंगी,
खामोश था होटों पे बात नहीं थी, कोई नहीं था ये अकेली मेरी थी जिंदगी
तुम मिले तो मिल गया ये जहाँ, तुम मिले तो हर पल है नया,
तुम मिले तो सबसे है फासला तुम मिले तो जादू छा गया,
तुम मिले तो जीना आ गया, तुम मिले तो मैने पाया है खुदा।।धृ.।।

पलके मुँदे चाहत मेरी सो रही थी, खुशबू हवाओं मे थी मैंने नही मेहसूस की
जाने कहाँ बहारें मेरी खिल रही थी खुशबु हवाओं मे थी मैने नही मेहसूस की
तुम मिले तो मेहकी बारीशें, तुम मिले तो जागी ख्वाईशें,
तुम मिले तो रंगो का है सिलसिला।।१।। तुम मिले तो जादू छा गया...

तूने दुवाएँ सुनी, दिलकी सदाएँ सुनी,
तुझसे मै माँगू और क्या, तुझ बिन अधुरा हूँ मै,
तेरे संग पुरा हूँ मै, करता हूँ तेरा शुक्रिया
कैसे कहूँ लम्हें मुझे छु रहे हैं, ऐसा लगा है इनमें तेरा ही तो एहसास है,
कैसे कहूँ दिल में नई आहटें है, ऐसा लगा है इनमे तेरा ही तो एहसास है
तुम मिले तो मेरा दिल गया, तुम मिले तो सबकुछ मिल गया,
तुम मिले तो लोगों से क्या वासता।।२।। तुम मिले तो जादू छा गया...

'तुम मिले' या सिनेमातील हे गाणं एकलं नी आत प्रवास सुरु झाला.

सगळं असतानाही समाधान नसतं. सगळं रिक्त, पोकळ वाटत असतं. आजुबाजुला खूप लोक असतात, पण मनातला संभ्रम कोणीच दूर करू शकत नाही. वर वर शांत पण आत मात्र विचाराचा कल्लोळ असतो.

आणि अशातच गुरुदेव भेटतात. या प्रवासाची प्रत्येकाची कहाणी वेगळी पण सगळ्यांचा शेवट मात्र तितकाच गोड! आणि मग काय जगणंच बदलून जातं सगळं! गुरुदेवांचे शब्द विचारांचा गोंधळ दूर करून टाकतात आणि कुणीतरी जादू करावी तसं जगणं सोपं होऊन जातं. सगळी कोडी सुटतात, सगळ्या चिंता, दुःख दूर जातात कारण त्या आपल्या आहेत असं वाटतंच नाही. ज्या गोष्टीच्या शोधात आपण वणवण फिरत असतो, ती मिळते-निखळ आनंद!

आणि मग पूर्वीचे दिवस आठवले की असं वाटतं, की कसे जगत होतो आपण? जे शोधत होतो ते आपणच आत कुठे तरी बंद करून ठेवलं होतं. 'काखेत कळसा आणि गावाला वळसा' म्हणतात नं, अगदी तसं! आजुबाजूला घटना पहाण्याची दृष्टी बदलून जाते जसं की, एरवी कटकट वाटणारा पाऊसही आनंद देऊन जातो. एका नवीन उत्साहाने आपण आयुष्याला सामोरं जातो.

मग लक्षात येतं की प्रत्येक सरत्या क्षणाबरोबर गुरुदेव आपल्या सोबत असतात. पण जसजसा विचार करत जातो, तसं लक्षात येतं की, 'अरे! गुरुदेव फक्त सोबतच नाहीत, ते तर आपल्यातच आहेत!' याचाच अर्थ असा होतो की गुरुदेवांशिवाय आपल्याला पुर्णत्वच नाही.

याच्यानंतर आणखीन काय बोलणार? आपण एवढंच म्हणू शकतो की जे काय आहे ते गुरुदेव तुमच्यामुळेच!

---

**पान नं. ५ वरून**

झालो आहे.' हे उत्तर ऐकल्यावर बोवास भैय्याने प्रश्न केला की, 'ज्या आईचे नाव घेऊन तुम्ही हाक मारता ती तुमची आई कोठे आहे?' या प्रश्नास बोवांनी उत्तर दिले की, 'बाबा माझी माता अगदी माझ्या जवळ असून ती मला प्रत्यक्ष दिसत आहे. ती अजरामर आहे, जो तिला सदंतःकरणाने हाक मारील त्यासच ती दिसते. माझी माता माझी एकट्याचीच नसून ती या अनंत ब्रह्मांडाची आई आहे, ती तुमची देखील आई आहे, तिस पाचारण कसे करावे हे संतसज्जनांपासून शिकले पाहिजे, एरव्ही ती दिसावयाची नाही, तिची लीला स्थूलदृष्टि सोडून सूक्ष्मदृष्टि केल्यावाचून कळणार नाही. तुम्ही मला थांबवून माझ्या दयाघन मातेचे गुणवर्णन करावयास लाविलेत याबद्दल मी आपला फार आभारी आहे.' बोवांचे हे सरळ पण मार्मिक उत्तर ऐकून तो भैय्या लाजला व हा कोणी तरी महात्मा आहे अशी त्याची खात्री होऊन बोवांस साष्टांग नमस्कार घालून तो निघून गेला.

◈◈◈

# अहो ऐकलत का?...✍

**- मुक्ता**

**हरवले ते गवसले का?**

मंदिरात गोकुळाष्टमीचा उत्सव चालू होता. एकही दिवस जायला जमले नव्हते. लताने विचारल्यावरही तिला 'बघू! जमले तर येईन.' असेच उत्तर दिले होते.

चवथ्या दिवसाची कथा होती. एका ठिकाणी जाणे आवश्यक होते. तसा त्या व्यक्तीला येण्याबद्दल शब्दही दिला होता. परंतु सकाळी सकाळीच रेडीओवर सगळी राधा-कृष्णाच्या भक्तीची गीते ऐकू आली आणि मनाला मंदिरात जाण्याची ओढ निर्माण झाली. मग ठरवले की आज मंदिरातच जायचे, दुसरीकडे जाणे रद्द केले.

सगळे आवरले व कामासाठी बाहेर गेले. घरी येताना घराच्या जवळ गळ्यातली चेन निसटून पडली व त्यातील पादुका दिसेनाशा झाल्या. मन फारच सैरभैर झाले. तशीच घरी आले, तर पाच मिनिटांनी त्या पादुका घरातच सापडल्या. तशीच उघडी चेन गळ्यात घातलेली असताना तीही शाबूत राहिली.

ठरवले की आज महाराजांचे दर्शन घ्यायचेच! मंदिरात कथा सुरु झाली. ओळी होत्या,

**वेधीयले येणे बोलाऊनी साजणे वो। आता राहीले येणे जाणे वो।।**

श्रीहरी मायापुरीतून कसा लक्ष वेधून घेतो हे महाराज पटवून देत होते आणि आतमध्ये अनुभूती येत होती. खरेच आज महाराजांनीच बोलाविले, म्हणून येणे झाले. कथा संपली व महाराजांशी फक्त पाच मिनिटे बोलावयास मिळाले. एक विकल्पाचा काटा अनेक दिवस मनास बोचत होता. महाराजांशी बोलल्यावर त्यांनी तो क्षणार्धात अलगद काढून टाकला. घरी यायला बराच उशीर लागला. वाटले की काटा काढल्यावर जखम उघडी राहू नये, त्यास मलमपट्टी व्हावयास पाहिजे म्हणूनच हा एकांत मिळाला की जेणेकरून नामाचे मलम लागले पाहिजे.

दिवसभराच्या सगळ्या घटना एकत्रित केल्या तर जाणवले, खरेच महाराज आपल्याशी कसे खेळ खेळतात! गळ्यातल्या पादुकांप्रमाणे विकल्पाच्या खाईत आपण हरवलो होतो, पण महाराजांनी पादुकाही घरात सापडवून दिल्या व आपल्या आतीलही हरवलेले सापडवून दिले.

**भक्ताकरिता उभा राहे। भक्ताची मी वाट पाहे। भक्ताचा मी भार वाहे। आपुले माथा।।**

(विज्ञान सागर अध्याय ३ रा)

- श्रीसमज -



# गुंजारव - २

**- आकांक्षा**

O' Lord, the Real Farmer, Working so hard in the Farm
Sowing the seeds of Sadchidanand
Watering them with Love and Emotion
Nurturing them with sparkling Fertilizer
And harvesting Lilies Lavender!

She promised to give me bushels of Roses
Sunflower Lilac Daffodils and Lotus
She made me use the Berries and Melons
Peppermint and Forget-me-not!

She flew me to the beautiful English Countryside
Lighthouse Cove and sunny beaches Hawaii
A merry ride in the Winterland train
To land on the Polar Station!

Ice creams and cake for a special occasion
Topped with cherries and toffees and icing
Wishing with all warmth and happiness
From heart 'Happy Birthday to you'
O' Lord, the Real Farmer,
Happy Birthday to You!!!

---

## रुचि रुचि भोजन

तू रे भोजन करी माझ्या भावा। भक्ति विनवीतसे देवा।।धृ।।
शुद्ध सत्वाचा भात केला। ऱ्हस्व मी चे मेतकुट वाढिले।।
दीर्घ मीचा घास घ्यावा।।१।।
बोध प्रबोधाचे घुसळण केले। ज्ञान नवनीत वरती आले।।
गुरुवचनांनी कढविले।।२।।
ठकू हे भांडे अधिकारी केले। निजबोधाने गाळीयेले।।
मीठची होवूनी तोंडी लावा। तू रे भोजन करी माझ्या भावा।।३।।
बलभीमराये कुरवाळीले। भागीरथीसी जेववीले।।
एकानंदे होऊनि ठेविले।।४।।

- श्रीसस भागिरथीनाथ

## संपादकीय...✍

साधकांच्या अनेक पायऱ्या व छटा 'पाझर' वाचताना अनुभवास येतात. तसेच सिद्ध पुरुषांचे अनुभव व चरित्र हेही आपणांस मार्गदर्शन करते. 'भक्तगाथे' तील श्रीसस बलभीम महाराजांच्या भक्तीचा दरवळ प्रत्येक लेखातून वेगळाच येतो. त्यांच्या जीवनात भक्तीशिवाय दुसरे काहीच नव्हते याचा अनुभव हा अंक वाचताना येईलच!

गुरुपौर्णिमा उत्सवातून मिळणारी शिदोरी साधकाला सशक्त बनवते याचा अनुभव यावर्षीच्या उत्सवात सर्वच गुरुभक्तांना आला. त्याचे पडसादही 'पाझर'च्या लेखांमधून उमटतातच! ही शिदोरी महाराज बेचव न करता चवीने खायला कसे घालतात हे 'रूचि रूचि भोजन' ची चव घेताना प्रत्ययास येईल.

श्री माधुरीनाथ वाढदिवस उत्सवातही सर्व गुरुभक्तांच्या कथांनी विविध रंग भरले व वाढदिवस उत्सव मनोहर केला. दरवर्षीच साधकांच्या ज्ञानाच्या वाढीचा आलेख या उत्सवात जाणवतो! असाच उत्तरोत्तर सर्व गुरुभक्तांच्या ज्ञानाचा वाढावा होवो हीच सद्‌गुरुचरणी प्रार्थना!

---

**पान नं. ११ वरून**

*शाश्वत शांत अखंड पूर्ण। सद्‌गुरु सगुण निर्गुण घन।।२।।*
*शब्द नाद कला बिंदू ओलांडा। विज्ञान सागर सद्‌गुरु जोडा।।३।।*
*दत्ताभागिरथी अपूर्व सोहळा। मौने भोगावा गुळी मुंगळा।।४।।*

**गोकुळाष्टमी उत्सव २०१२ श्रावण शु. ८**
**३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०१२**

*सये। हरी लाघवी वो।।धृ।।*
*वाजवुनि मोहरी मानस मोहरी वो। झाली नेणवे कैसी परी वो।।१।।*
*पालवूनि मज सांगे निजगुज वो। गेली समूळ लोकलाज वो।।२।।*
*निरखिता दिठी वो पडियली मिठी वो। याती कुळा झाली तुटी वो।।३।।*
*वेधीयले येणे बोलाऊनी साजणे वो। आता राहीले येणे जाणे वो।।४।।*
*सये याचा संग वो करिता निःसंग वो। शोभे निजानंद रंगे वो।।५।।*



## उत्सव विशेष...✍

**गुरुपौर्णिमा उत्सव २०१२**
**आषाढ शु. ७ ते १५ शके १९३४ २६ जून ते ३ जुलै २०१२**
**मूळपद**

*चिदानंदीचा ऐसा राजा। सदोदित भोगी निजभाजा।*
*काय वानू मी त्याच्या साजा। पाहि पाहि तेथील नवल वो जा।।धृ.।।*
*मन हरोनी झाले मनोहर। तेची शोभती अतिरहंवर।*
*महिभ्रमणी बोध नित्य स्वार। पंचतिसांसी एक सरदार।।१।।*
*अनिज सांडुनि निज सोहंबीज। तेची डुल्लती महामतंगज।*
*कामधेनु दुभे दिवस सांज। रवि आगळा तेथ तेजःपुंज।।२।।*
*ज्याच्या मंदिरा चाऱ्ही दरवाजे। चौपदार चारी उभे ठेले जे।*
*शब्द निःशब्दी मंत्री बैसला जे। अनाहत भेरी नित्य वाजे।।३।।*
*उन्मनीचे सतत ज्यासी स्थान। तेथ हरपले देहभान।*
*तेथ सहज निजी निजोन। सोहिरा झालाचि तेथ लीन।।४।।*

**श्रीसस भागिरथीनाथ जयंती उत्सव २०१२**
**११ जुलै ते १८ जुलै २०१२ आषाढ अमावस्या**

*गुरु भागिरथी जनक जननी। पाळी आनंदाने उपदेशे।।१।।*
*खेळविते प्रेमे सांगे ज्ञान गोष्टी। तुज आटाआटी काही नाही।।२।।*
*शिकविते सदा वैराग्य असावे। उदास रहावे सदोदित।।३।।*
*जेवाया घालिते भक्तीचे पक्वान्न। तू भगवान जाणविते।।४।।*
*चिद्रत्न भूषणे नित्य सजविते। पाहूनी तोषते आपुले ठायी।।५।।*
*संत संगामाजी घेऊनिया जाते। ब्रह्मत्वाचा देते अनुभव।।६।।*
*दत्ता भागिरथी नाथ माता पिता। मित्र त्राता भ्राता माझी एक।।७।।*

**श्रीसस माधुरीनाथ वाढदिवस उत्सव २०१२**
**२५ जुलै ते १ ऑगस्ट २०१२ श्रावण शु. १३ परम १४**

*चैतन्य सद्‌गुरु व्यापक पहा। सगुण गुरुपदी अनन्य रहा।।धृ.।।*
*भक्ती प्रेमाचा लुटा आनंद। चैतन्य जाणा सोडुनी द्वंद्व।।१।।*

**पान नं. २ वर**

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. २ जाने ते ११ जाने. २०१२

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. १८ फेब्रु. ते २० फेब्रु २०१२

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. ४ मार्च ते १२ मार्च २०१२

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. ३० एप्रिल ते ६ मे २०१२

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. २५ जून ते ४ जुलै २०१२

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. २५ जुलै ते ३१ जुलै २०१२

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. २१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२

BOOK-POST

To,

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

**अधिक भाद्रपद १८ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०१२**
**अधिक महिन्याचे ३० + ३ चे कथा करून दान करा!**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, जी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२